## निवडक



बाहेरीलवाडा केरी सत्तरी : हनुमान जयंती प्रसंगी नारायण गाड, दीपक नार्वेकर, शिवाजी गाड, संजय सावळ व इतर.

## बाहेरीलवाडा केरी येथे हनुमान जन्मोत्सव उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १८ :** बाहेरीलवाडा केरी–सत्तरी येथील हनुमान मंदिरातर्फे श्री शंकरनाथ मठाच्या प्रांगणात हनुमान जन्मोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.सकाळीपासून पाळणागीते व हनुमान जन्मसोहळा संपन्न झाला.महिला व पुरुष भक्तगणांनी पाळणागीत,हनुमान स्तोत्र,हनुमान प्रार्थना,हनुमान जप सादर केला.त्यानंतर हनुमान चालिसा पठण महायज्ञ (१०८ वेळा), सादर करण्यात आला. नारायण गाड यांच्या यजमानपदाखाली श्री सत्यमारुती व्रत पूजा झाली. त्यानंतर आरती व महाप्रसाद तसेच स्थानिक कलाकारांतर्फे भजनाचा कार्यक्रम झाला. श्री विठ्ठल रखुमाई दिंडी पथक विर्डी सांखळी यांच्या दिंडीच्या जयघोषात श्री हनुमान पालखीचा मिरवणूक सोहळा संपन्न झाला.या सोहळ्यास श्री हनुमान समितीचे सर्व पदाधिकारी,ग्रामस्थ,श्री शंकरनाथ मठाचे अनुयायी,निमंत्रित भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. रात्री चेंदवणकर गोरे दशावतार नाट्य मंडळातर्फे 'ऋतुमती हरण' हे नवीन दर्जेदार नाटक सादर झाले.संपूर्ण कार्यक्रमाला भाविक व भक्तगणांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

---

## साळ येथील सरकारी हायस्कूलच्या हर्षदा वडार हिची राष्ट्रीय स्तरावर चमक

■ टीम दैनिक हेराल्ड



**साळ, दि. १८ :** कोटक एज्युकेशन फाउंडेशनने 'क्षमता गोवा' कार्यक्रमाचा एक भाग म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद च्या सहकार्याने शैक्षणिक वर्ष २०२४ – २०२५ साठी १०० शासकीय शाळांमध्ये सीईएफआर – कम्युनिकेटिव्ह इंग्लिश फ्युचर रेडीनेस प्रोग्रॅम राबवला. या उपक्रमाचा एक भाग म्हणून उद्याचा प्रतिध्वनी ही एक राष्ट्रीय स्तरावरील कथाकथन स्पर्धा जानेवारी २०२५ मध्ये आयोजित करण्यात आली होती. सरकारी हायस्कूल, साळ–डिचोली येथील इयत्ता ६ वी ची विद्यार्थिनी हर्षदा वडार हिने या स्पर्धेत सहभाग घेतला आणि कनिष्ठ गटात राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला. ती भारतभरातून निवडण्यात आलेल्या ८०० विद्यार्थ्यांपैकी एक होती. हर्षदाचे हे यश तिच्या इंग्रजी शिक्षिका खुशाग्री हरी सावंत यांचे मार्गदर्शन, शाळेचे मुख्याध्यापक सतीश तळकर आणि सर्व शिक्षकांच्या खंबीर पाठिंब्यामुळे शक्य झाले. कोटक एज्युकेशन फाउंडेशनने ही संधी उपलब्ध करून दिली आणि हर्षदाला राष्ट्रीय स्तरावर आपला आत्मविश्वास आणि कौशल्य दाखवण्याची संधी दिली. हर्षदा वडार हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

---

## हरमल येथे गायक शुभम नाईक यांचा सन्मान

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १८ :** येथील खालचावाडा श्री नारायण देव मंदिरात, बेती मठातील नूतन श्री स्वामी समर्थ मूर्तीचे आगमन झाल्यानंतर आयोजित भजन, गायन कार्यक्रमात गायक शुभम नाईक यांचा सन्मान करण्यात आला.

प्रारंभी देवस्थानचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.ह्यावेळी देवस्थानचे माजी अध्यक्ष मधुकर गोकर्णकर यांच्याहस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गायक शुभम नाईक यांचा सन्मान करण्यात आला. श्री नारायण देवस्थान समिती,उदयोन्मुख गायक कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील असून आगामी काळात अनेकविध उपक्रम राबवून परिसरात स्फूर्तिदायी वातावरण निर्माण करण्याचे ठरवले आहे.गायक शुभम हा युवा गायक कलाकारांचा आदर्श असल्याने त्याच्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे अध्यक्ष राजेश गोकर्णकर यांनी व्यक्त केले.ह्या कार्यक्रमात साथी गायक दत्तू गावस,मनोज चौकुळकर तसेच अमोल गवस (हार्मोनियम),मयूर गावडे (तबला) व साईश म्हामल (पखवाज)व ऋषिकेश सावंत (ध्वनि) यांनी साथसंगत केली.प्रारंभी सचिव शिशिर गोकर्णकर,प्रशांत पेडणेकर,निखिल पेडणेकर,गोविंद पेडणेकर,पुंडलिक पेडणेकर,कृष्णा पेडणेकर, बाबलो उगवेकर यानी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.ह्या कार्यक्रमात अनेक नाट्य, भाव व भक्तिगीते गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध केले.ह्यावेळी नारायण देव महिला मंडळाने दिंडी सादर करून वाहवा मिळवली.

---

## चोपडेकर मेमोरियल सरकारी माध्यमिक विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १८ :** ज. अ. चोपडेकर मेमोरियल सरकारी माध्यमिक विद्यालय आगरवाडा यांचा यंदाचा दहावीचा निकाल वर्ष पद्धतीप्रमाणे उत्कृष्ट लागला. या विद्यालयातील २२ विद्यार्थ्यांपैकी २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एकूण निकाल ९५.६६% लागला. विद्यालयाने आपल्या उज्वल यशाची परंपरा अखंडित ठेवली आहे. या विद्यालयात कु. ईशा राजेश गडेकर ही मुलगी एकूण ८९.६६% गुण मिळवून विद्यालयात प्रथम आली, तिला गणितात सर्वाधिक ९५ गुण मिळाले आहेत.त्याचबरोबर सृष्टी संतोष चोडणकर ही ७५.३३% गुण मिळवून विद्यालयात द्वितीय आली, तर कार्तिकी राजेंद्र मुग्दार हीने ७४ टक्के गुण मिळवून विद्यालयात तिसरा क्रमांक पटकावण्याचा मान मिळविला . या व्यतिरिक्त एकूण बारा विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले तर सात विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी पटकावली. विद्यालयाच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक मिसेस जेसी परेरा तसेच पूर्वा समितीचे मुख्याध्यापक अनुक्रमे श्री सुदन नाईक गावकर आणि श्री यदुनंद नाईक देसाई यांनी सर्व शिक्षक वर्गाने घेतलेल्या मेहनती बद्दल आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या अपार परिश्रमाबद्दल त्यांचे मुक्तकंठाने कौतुक केले आहे .आपल्या उज्वल यशाची परंपरा चालू ठेवल्याबद्दल पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष अविनाश गावकर आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या प्रमुख अध्यक्षा दीपाली लिंगुडकर यांनी विद्यार्थी आणि शिक्षक वर्गाचे अभिनंदन केले आहे.

---

## चांदेल हसापूर येथे दलीत बांधवांचा गौरव

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १८ :** डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ जयंतीनिमित्त चांदेल हंसापूर पंचायत समितीतर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ जयंती सोहळा उत्साहात पार पडला. या जयंतीनिमित्त उपस्थित मान्यवर चादेल हंसापूर पंचायत चे सरपंच तुळशीदास गावस, उप सरपंच रुचिरा मळीक, पंच सदस्य प्रजय मळीक, बाळा शेटकर तसेच पंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बुधाची तु. हसापुरकर आले ईडीच्या कराटे प्रशिक्ष तथा रेफरी यांच्या सत्कार चिन्हे, शाल, श्रीफळ आणि मानधन देऊन सोहळा झाला. हसापुरकर कुटुबातर्फे आपल्या पंचायत सरपंच उपसरपंच व पंच सदस्य तसेच संपूर्ण पंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थ यांचे मनःपुर्वक आभार मानले.

# गुजरात टायटन्स- दिल्ली अव्वल स्थानासाठी भिडणार

### साई सुदर्शन, गिलकडून दमदार खेळीची अपेक्षा स्टार्क, सिराजचे असणार आव्हान

**अहमदाबाद, दि. १८ :**

आयपीएल २०२५ चा ३५ वा सामना शनिवारी दि. १९ रोजी गुजरात टायटन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळला जाईल. या सामन्यात दोन्ही संघांमध्ये अव्वल स्थानासाठी लढाई होईल. सध्या, दिल्ली १० गुणांसह पहिल्या स्थानावर आहे तर गुजरात आठ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. अहमदाबादमध्ये खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात सर्वांच्या नजरा मिचेल स्टार्क आणि मोहम्मद सिराजवर असतील.

सुपर ओव्हरमध्ये राजस्थानला हरवल्यानंतर दिल्लीचे मनोबल उंचावले आहे. त्यांच्या विजयात स्टार्कने महत्त्वाची भूमिका बजावली. ऑस्ट्रेलियाच्या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने तीन अचूक यॉर्कर टाकले आणि सुपर ओव्हरही टाकली.बॉर्डर गावस्कर ट्रॉफीनंतर चॅम्पियन्स ट्रॉफी न खेळणारा स्टार्क पूर्णपणे ताजेतवाने होऊन आयपीएलमध्ये दाखल झाला आहे.

आतापर्यंत १० पेक्षा जास्त इकॉनॉमी रेटने १० बळी घेणारा स्टार्क दिल्लीच्या वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करत आहे ज्यामध्ये मुकेश कुमार आणि मोहित शर्मा यांचाही समावेश आहे.त्याच्याकडे आता गुजरात टायटन्सच्या टॉप ऑर्डरला रोखण्याची जबाबदारी असेल ज्यामध्ये कर्णधार शुभमन गिल, साई सुदर्शन, जोस बटलर यांचा समावेश आहे. आतापर्यंत या तिघांनी फलंदाजीची जबाबदारी सांभाळली आहे. गुजरातच्या मधल्या फळीला कोणत्याही कठीण




परीक्षेतून जावे लागले नाही आणि जेव्हा लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध वेळ आली तेव्हा ते अपयशी ठरले. जर दिल्लीने गुजरातच्या वरच्या फळीला लवकर बाद केले तर मधल्या फळीची कमकुवतपणा पुन्हा एकदा उघड होईल.

दुसरीकडे, बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये सरासरी कामगिरी केल्यानंतर आणि चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या भारतीय संघातून बाहेर पडल्यानंतर, सिराजने ब्रेक दरम्यान त्याच्या कमतरतांवर कठोर परिश्रम केले आहेत आणि त्याचे निकाल आता पाहायला मिळतील. सिराजने आतापर्यंत ८.५० च्या इकॉनॉमीने १० विकेट्स घेतल्या आहेत. विशेषतः पॉवर प्लेमध्ये त्याची कामगिरी उत्कृष्ट होती.आता त्याचा सामना दिल्लीच्या खराब फॉर्ममधील सलामीवीर जॅक फ्रेझर मॅकगर्क आणि प्रतिभावान अभिषेक पोरेल यांच्याशी होईल. जर तो अपयशी ठरला तर दिल्लीसाठी धावा करण्याची जबाबदारी केएल राहुल आणि करुण नायरवर असेल.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये गुजरातकडून खेळणारा दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेल त्याच्या घरच्या मैदानावर प्रभाव पाडू इच्छितो. दोन्ही संघांकडे उत्कृष्ट फिरकी गोलंदाज आहेत. गुजरातकडे साई किशोर आणि राशिद खान, तर दिल्ली संघात कुलदीप यादव आणि विपराज निगम आहेत.

**संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :** गुजरात टायटन्स: साई सुदर्शन, शुभमन गिल (कर्णधार), जोस बटलर (विकेटकीपर), वॉशिंग्टन सुंदर, शेरफेन रदरफोर्ड, शाहरुख खान, राहुल तेवतिया, अर्शद खान, रशीद खान, रविश्रीनिवासन साई किशोर, मोहम्मद सिराज. प्रसिद्ध कृष्णा.

**दिल्ली कॅपिटल्स:** जेक फ्रेझर–मॅकगर्क, फाफ डू प्लेसिस, अभिषेक पोरेल, करुण नायर, केएल राहुल (यष्टीरक्षक), अक्षर पटेल (कर्णधार), ट्रिस्टन स्टब्स, आशुतोष शर्मा, विप्रज निगम, मिचेल स्टार्क, कुलदीप यादव, मोहित शर्मा, मुकेश कुमार.

## प्रत्येक नागरिकाला हक्कांची जाणीव असणे आवश्यक

■ टीम दैनिक हेराल्ड

**गुळेली, दि. १८ :** नवचेतना प्रगती मंच वाचनालया वांते सत्तरीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कल्याण आश्रम गोवा चे अध्यक्ष डॉ. व्यंकू गावडे, संघटन मंत्री श्री विठ्ठल, संचालक मागासवर्ग सहकारी आयोग प्रदीप गावडे, नवचेतना प्रगती मंच वाचनालय अध्यक्ष नितिन शिवडेकर, आदी उपस्थित होते.

डॉ. व्यंकू गावडे म्हणाले की, प्रत्येक नागरीकांना आपल्या हक्कांची जाणीव असणे आवश्यक आहे. सर्वसामान्य नागरीकांना हक्क

▶ डॉ. व्यंकू गावडे : नवचेतना प्रगती मंच वाचनालया वांतेतर्फे आंबेडकर जयंती साजरी

मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले त्यांच्या कार्यामुळेच आज शेवटच्या थरातील माणूस सुद्धा हक्काने जगत आहे. काही ठिकाणी आपल्या बांधवावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आपण एकत्र येऊन त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे ते म्हणाले. यावेळी इतर मान्यवरांनीही आपले विचार मांडले. स्वागत नितिन शिवडेकऱ्यांनी केले.

## डेवाल्ड ब्रेविस चेन्नई सुपर किंग्जमध्ये समावेश

**अहमदाबाद, दि. १८ :**

दक्षिण आफ्रिकेचा युवा फलंदाज डेवाल्ड ब्रेविस आयपीएल २०२५ मध्ये चेन्नई सुपर किंग्जमध्ये सामील झाला आहे. ब्रेविसने त्याच्या इंस्टाग्राम हँडलवर चेन्नईसोबतची कहाणी शेअर केली. २०२४ मध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळलेल्या ब्रेव्हिसला २०२५ च्या मेगा लिलावात खरेदी करण्यात आले नाही.

वेगवान गोलंदाज गुरजपनीत सिंगच्या जागी ब्रेव्हिसचा समावेश करण्यात आला आहे. गुरजपनीतला नेट प्रॅक्टिस दरम्यान दुखापत झाली. ब्रेव्हिसला सीएसकेने २.२ कोटी रुपयांना करारबद्ध केले आहे.

दरम्यान, आयपीएल२०२५ च्या उर्वरित सामन्यांसाठी गुजरात टायटन्सने जखमी ग्लेन फिलिप्सच्या जागी श्रीलंकेचा अष्टपैलू दासून शानाकाचा समावेश केला आहे. तथापि, कागिसो रबाडाच्या बदलीची घोषणा केलेली नाही. शनाका यापूर्वी २०२३ मध्ये जीटीकडून खेळला होता. गुजरातने त्याला ७५ लाख रुपयांना संघात सामील केले आहे.

डेवाल्ड ब्रेविडने २०२२ मध्ये मुंबई इंडियन्सकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले. त्याने आतापर्यंत १० सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने २३० धावा केल्या आहेत. या काळात त्याचा स्ट्राईक रेट १३३.७२ होता.

६ एप्रिल रोजी खेळल्या गेलेल्या सामन्यात, हैदराबादच्या डावाच्या सहाव्या षटकात ग्लेन फिलिप्सला दुखापत झाली. प्रसिद्ध कृष्णाच्या षटकात थ्रो टाकताना त्याला स्नायूंचा ताण आला. नंतर फिजिओने त्याला मैदानाबाहेर नेले.

फिलिप्सने आतापर्यंत एकूण ८ आयपीएल सामने खेळले आहेत. या काळात त्याने ६५ धावा केल्या आहेत आणि दोन विकेट घेतल्या आहेत. २०२५ च्या आयपीएल मेगा लिलावात गुजरातने फिलिप्सला २ कोटी रुपयांना खरेदी केले. २०२३ च्या आयपीएल हंगामात त्याला प्लेइंग–११ मध्ये संधी मिळाली नाही.

शनाकाने आतापर्यंत आयपीएलचा फक्त एकच हंगाम खेळला आहे, ज्यामध्ये त्याने जीटीकडून तीन सामने खेळले होते, ज्यात त्याने फक्त २६ धावा केल्या होत्या आणि दोन हंगामांत त्याला गोलंदाजी करण्याची संधीही मिळाली नव्हती. दरम्यान, वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा देखील वैयक्तिक कारणांमुळे ३ एप्रिल रोजी घरी गेला. तो भारतात कधी परतणार याबद्दल कोणतीही स्पष्टता नाही. जीटीने रबाडाच्या जागी कोणाचीही निवड केलेली नाही. जीटीने त्यांच्या सहापैकी चार सामने जिंकले आहेत आणि लीग स्टेजमधील जवळजवळ अर्धे सामने संपल्यानंतर पॉइंट टेबलमध्ये दुसऱ्या स्थानावर आहे. त्यांचा पुढचा सामना शनिवारी दुपारी घरच्या मैदानावर टेबल टॉपवर असलेल्या दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध आहे.

## मंगिरीश विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा प्राचीन इतिहासाचा अभ्यास

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १८ :** मंगिरीश विद्यालयाच्या इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी १७ एप्रिल २०२५ रोजी संत सोहीरोबनाथ आंबिये महाविद्यालयातील पुरातत्त्व संग्रहालयाला शैक्षणिक भेट देत एक समृद्ध अनुभव घेतला. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वस्तूंचे प्रत्यक्ष दर्शन घडवून आणण्यासाठी अभ्यासक्रमाचा भाग म्हणून ही सहल आयोजित करण्यात आली होती.

कार्यकारी मुख्याध्यापिका श्रीमती गौरी वेर्लेकर व संपूर्ण शिक्षकवर्गाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध ऐतिहासिक विभागांना भेट दिली. या शैक्षणिक भेटीचे मार्गदर्शन डॉ. रोहित फळगावकर व प्रा. प्रियांका परब यांनी

▶ **पुरातत्त्व संग्रहालयास शैक्षणिक भेट**

केले.

या संग्रहालयात विद्यार्थ्यांना आद्य काळातील हत्यारे, विविध देवी–देवतांच्या मूर्ती, शिलालेख व भारताच्या विविध कालखंडातील शिल्पांची माहिती मिळाली. याशिवाय, औषधी व वनस्पतींच्या बागेचीही त्यांनी भेट घेतली, ज्यातून त्यांना पारंपरिक औषध ज्ञानाची माहिती मिळाली.

अशा प्रकारच्या सहली विद्यार्थ्यांना वर्गखोलीत मिळणाऱ्या शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक वारसा समजून घेण्यासाठी प्रेरणा देतात. विद्यार्थ्यांसाठी हा एक संस्मरणीय व ज्ञानवर्धक अनुभव ठरला.

## हळर्ण पंचक्रोशी विद्यालयाचा दहावीचा १०० टक्के निकाल

■ टीम दैनिक हेराल्ड




**साळ, दि. १८ :** हळर्ण पंचक्रोशी विद्यालय – हळर्ण चा यंदाच्या २०२४–२५ गोवा बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकाल प्राप्त करून आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेची ठसठशीत मोहर उमटवली आहे. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

यामध्ये समीक्षा जाधव हिने ६९.१६ टक्के मिळवत प्रथम येण्याचा मान पटकावला, नैतिक गवस ६५.५ टक्के मिळवत दुसऱ्या स्थानी आला. तर तिसरा क्रमांक श्रेयस गवस याने ६४ टक्के मिळवून पटकवला तसेच अक्षय राणे ह्याने ६३. ५ टक्के गुण मिळवून चौथा आला व सर्वांगी नाईक हिने ५८. ३३ टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक पटकवला.

या विद्यालयातून एकूण अकरा विद्यार्थी परीक्षेला बसले होते, ते सर्वच्या सर्व उत्तीर्ण झाले, त्यात चार विद्यार्थी प्रथम श्रेणीत, चार विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर तीन विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले.

हे यश शाळेच्या शिस्तप्रिय वातावरणाचे, शिक्षकांच्या अथक मेहनतीचे आणि विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. शाळेच्या यशामागे पालकांचा सहभाग देखील मोलाचा ठरला आहे. शाळेने नेहमीच सर्वांगीण विकासावर भर दिला आणि यंदाही विद्यार्थ्यांनी शाळेचा विश्वास सार्थ ठरवला. वेळोवेळी सरावं परीक्षा, मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांचे मनोधर्य वाढले आणि आत्मविश्वासाने त्यांनी परीक्षा दिली. शिक्षण म्हणजे गुणांचा खेळ नसून ज्ञान, संस्कार व व्यक्तिमत्व विकासाचा प्रवास आहे हे शाळेने पुन्हा एकदा सिद्ध केले.

शाळेच्या अध्यक्षा प्रिया परब, व्यवस्थापक फटी परब व मुख्याध्यापक सर्वेश परब तसेच सर्व शिक्षक, कर्मचारीवर्ग तसेच पालकांनी यशवंत विद्यार्थीचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मुंबई इंडियन्सचा सलग दुसरा विजय

### सनरायझर्स हैदराबादचा ४ गडी राखून पराभव : विल जॅकने घेतल्या २ विकेट

**मुंबई, दि. १८ :**

आयपीएलच्या १८ व्या हंगामात मुंबई इंडियन्सने सलग दुसरा विजय मिळवला. गुरुवारी संघाने सनरायझर्स हैदराबादचा ४ विकेट्सने पराभव केला. विल जॅक्सने ३६ धावा केल्या आणि २ बळी घेतले. एमआयने याआधीही दिल्ली कॅपिटल्सचा पराभव केला होता.

मुंबईने वानखेडे स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. उत्कृष्ट गोलंदाजीसमोर हैदराबादने ५ विकेट गमावून १६२ धावा केल्या. मुंबईने १८.१ षटकांत ६ गडी गमावून लक्ष्य गाठले. रोहित शर्माने २६, रायन रिकेल्टनने ३१ आणि सूर्यकुमार यादवने २६ धावा केल्या. हैदराबादकडून कर्णधार पॅट कमिन्सने ३ आणि इशान मलिंगाने २ विकेट घेतल्या. मुंबईने १९ व्या षटकात विजय मिळवला.

१९ व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर मुंबई इंडियन्सने विजय मिळवला.



तिलक वर्माने झीशान अन्सारीविरुद्ध चौकार मारला आणि संघाला ४ विकेटने विजय मिळवून दिला.

१८ व्या षटकात मुंबई इंडियन्सने २ विकेट गमावल्या. षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर हार्दिक पंड्या झेलबाद झाला. त्याला इशान मलिंगाने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. हार्दिकने ९ चेंडूत २१ धावा केल्या. षटकाच्या पाचव्या चेंडूवर नमन धीरही एलबीडब्ल्यू बाद झाला.

१५ व्या षटकात मुंबईने चौथी विकेट गमावली. पॅट कमिन्सने षटकाचा तिसरा चेंडू गुड लेन्थवर टाकला. विल जॅक्सने मोठा फटका मारला, पण मिड–ऑफवर त्याचा झेल सुटला. त्याने ३६ धावा केल्या.

१३ व्या षटकात मुंबईने तिसरी विकेट गमावली. पॅट कमिन्सने षटकातील चौथा चेंडू स्लो टाकला. सूर्यकुमार यादवला झीशान अन्सारीने मिडऑफला झेलबाद केले. सूर्याने २६ धावा केल्या.

मुंबई इंडियन्सने ११ व्या षटकात १०० धावा पूर्ण केल्या. झीशान अन्सारीच्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर सूर्यकुमार यादवने २ धावा घेतल्या. यासोबतच संघाचे शतकही पूर्ण झाले.

मुंबईने आठव्या षटकात आपली दुसरी विकेट गमावली. हर्षल पटेलने ओव्हरचा पाचवा चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर टाकला. रायन रिकेल्टनने मोठा फटका मारला, पण पॉइंट पोझिशनवर ट्रॅव्हिस हेडने त्याला झेलबाद केले. रिकेल्टनने ३१ धावा केल्या.७ व्या षटकात रायन रिकेल्टन नो बॉलवर झेलबाद झाला. षटकाच्या पाचव्या चेंडूवर झीशान अन्सारीने शॉर्ट पिच बॉल टाकला. रिकेल्टन कव्हर्स पोझिशनमध्ये झेलबाद झाला. तो पॅव्हेलियनमध्ये परतणारच होता तेव्हा तिसऱ्या पंचाने नो बॉलचा संकेत दिला. खरं तर, चेंडू टाकला तेव्हा यष्टिरक्षक हेनरिक क्लासेनचे ग्लोव्हज स्टंपच्या पुढे होते. त्यामुळे चेंडू नो बॉल म्हणून घोषित करण्यात आला. यावेळी रिकेल्टन २१ धावांवर खेळत होता.

पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात मुंबई इंडियन्सने त्यांचे अर्धशतक पूर्ण केले. इशान मलिंगाविरुद्धच्या षटकातील चौथ्या चेंडूवर रायन रिकेल्टनने चौकार मारला. यासह संघाने ५० धावा पूर्ण केल्या. ६ षटकांनंतर, मुंबईची १ विकेट गमावून ५५/१ अशी स्थिती होती.

मुंबईने चौथ्या षटकात पहिली विकेट गमावली. षटकाच्या पाचव्या चेंडूवर पॅट कमिन्सने फुल टॉस टाकला आणि रोहित कव्हर्स पोझिशनमध्ये झेलबाद झाला. रोहितने १६ चेंडूत २६ धावा केल्या. १६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, मुंबई इंडियन्सकडून रोहित शर्मा आणि रायन रिकेल्टन डावाची सुरुवात करायला आले. पहिल्या षटकात संघाने ४ धावा काढल्या. हैदराबादच्या मोहम्मद शमीने पहिले षटक टाकले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २२६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 226 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .